(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठीत अनुवाद)

[२०१८] ३ एस. सी. आर. ९९४

पान क्रमांक ९९४ ते १००३.

फौजदारी अपील क्रमांक : ४५९/२०१६.

कविता चंद्रकांत लखानी

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य आणि इतर

(फौजदारी अपील क्रमांक ४५९/२०१६)

२४ एप्रिल,२०१८.

[न्यायमूर्ती ए. के. सिक्री आणि न्यायमूर्ती आर. के. अग्रवाल]

दंड संहिता, १८६० – कलम ३६६ – च्या खाली आरोप निश्चित करणे – जेव्हा न्याय्य नसेल तेव्हा – अंतर्गत आरोप निश्चित करणे – अपीलकर्ता महिलेने उत्तरवादी क्रमांक २ विरुद्ध एफ. आय. आर. नोंदवला, जिच्याशी ती पूर्वी रिलेशनशिपमध्ये होती - अपीलकर्ता महिलेने सांगितले की, त्या दुर्दैवी रात्री जेव्हा ती आणि उत्तरवादी क्रमांक २ एका पार्टीत उपस्थित होते, तेव्हा पार्टी संपल्यानंतर,

उत्तरवादी क्रमांक २ जेवणासाठी कार्यक्रमस्थळी सोडण्याच्या बहाण्याने तिला त्याच्या घरी घेऊन गेला आणि तिथे पोहोचल्यावर अपीलकर्ता महिलेने गाडीतून बाहेर पडण्यास नकार दिला, तेव्हा उत्तरवादी क्रमांक २ ने तिला जबरदस्तीने उचलले, त्याच्या घरी नेले आणि तिला मारहाण करण्यास सुरुवात केली - नंतर, अपीलकर्ता महिलेने पुढे असा जबाब दिला की उत्तरवादी क्रमांक २ ने तिचा विनयभंगही केला - आरोपपत्र दाखल - उत्तरवादी क्रमांक २ ला इतर गोष्टींबरोबरच भा. दं. वि.च्या कलम ३६६ अंतर्गत गुन्ह्यासंदर्भात सोडून देण्यात आले - अपील दाखल करण्यात आले - निर्णय : कलम ३६६ अंतर्गत आरोपासाठी, केवळ महिलेचे अपहरण झाल्याचे आढळणे पुरेसे नाही - हे सिद्ध करावे लागेल की कोणत्यातरी व्यक्तीशी लग्न करण्यास भाग पाडले जावे किंवा बेकायदेशीर संभोगासाठी भाग पाडले जावे या उद्देशाने आरोपीने महिलेचे अपहरण केले होते- प्रस्तुत प्रकरणात, अपीलकर्ता महिलेने केलेले प्राथमिक आरोप असे होते की उत्तरवादी क्रमांक २ ने तिला जबरदस्तीने त्याच्या घरी नेले, प्रथम तिच्यावर प्रेम व्यक्त केले आणि नंतर तिला मारहाण करण्यास सुरुवात केली जी वस्तुस्थिती रेकॉर्डवर स्पष्ट आहे - तथापि, त्यानंतर एका आठवड्याने अपीलकर्ता महिलेने विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आणि असे सांगितले की लज्जेखातर तिने ते आधी सांगितले नाही - यावर विश्वास बसत नाही कारण अपीलकर्ता महिलेने एफ.आय.आर. हा घटनेच्या पाच दिवसांनंतर योग्य विचारविनिमय करून दाखल केला, आणि एका आठवड्यात तिने

छेडछाडीचा उल्लेख करण्याचा विचार का केला आणि तेव्हा तिला लाज का वाटली नाही - जरी उत्तरवादी क्रमांक २ ने तिला जबरदस्तीने त्याच्या घरी नेले हे सिद्ध झाले असले तरी, त्याचा तिच्याशी लग्न करण्याचा किंवा तिला बेकायदेशीर संभोगासाठी जबरदस्ती करण्याचा किंवा फूस लावण्याचा हेतू होता हे नंतरचे विधान स्पष्टपणे पश्चातबुद्धीने नमूद केले होते - उत्तरवादी क्रमांक २ विरुद्ध भा. दं. वि.च्या कलम ३६६ अंतर्गत आरोपासाठी खटला चालविता येत नाही.

अपील फेटाळून लावताना, न्यायालयाने पुढील निर्णय दिला.

निर्णय :- १.१ 'अपहरण' हा गुन्हा ठरवण्यासाठी एखाद्या व्यक्तीला बेकायदेशीरपणे जबरदस्तीने किंवा फसवणुकीने नेले पाहिजे, म्हणजेच, एखाद्या व्यक्तीला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास भाग पाडण्यासाठी जबरदस्तीने किंवा कपटपूर्ण मार्गांनी भाग पाडले पाहिजे. या कलमाअंतर्गत आरोपीचा हेतू हा गुन्ह्याचा आधार आणि आवश्यक घटक आहे. आरोपीची इच्छा, हेतू आणि वर्तन गुन्हा निश्चित करते आणि आरोपीचा हेतू हा प्रत्येक प्रकरण निश्चित करण्यामध्ये महत्त्वाचा प्रश्न आहे. एकदा आरोपीचा आवश्यक हेतू स्थापित झाला की, गुन्हा पूर्ण होतो, मग आरोपी त्याचा उद्देश साध्य करण्यात यशस्वी होवो अथवा न होवो आणि महिलेने लग्नाला किंवा बेकायदेशीर संभोगाला संमती देवो अथवा न देवो. याशिवाय, भा.दं.वि.च्या कलम ३६६ अंतर्गत गुन्हा प्रस्थापित करण्यासाठी, अभियोग पक्षाला हे

सिद्ध करणे आवश्यक आहे की आरोपीने तक्रारदार महिलेला कोणत्याही ठिकाणाहून जाण्यास फूस लावली किंवा जबरदस्तीने भाग पाडले, की असे प्रलोभन फसव्या मार्गाने केले होते. भा. दं. वि. च्या कलम ३६६ अंतर्गत आरोपाचा जोवर संबंध आहे, केवळ महिलेचे अपहरण झाले आहे हा निष्कर्ष पुरेसा नाही. तर हे सिद्ध करणे आवश्यक आहे की आरोपीने महिलेचे अपहरण या उद्देशाने केले होते की तिच्यावर जबरदस्ती केली जाऊ शकते, किंवा त्याला याबाबत स्वतःची अशी जाणीव होती की तिला कोणत्याही व्यक्तीशी लग्न करण्यास भाग पाडले जाईल किंवा तिला विधिनिषिद्ध संभोग करण्यास जबरदस्ती किंवा फूस लावली जाऊ शकते किंवा त्याला स्वतःची हि जाणीव होती कि, तिला विधिनिषिद्ध संभोग करण्यास भाग पाडले जाईल किंवा फूस लावली जाईल. जोपर्यंत अभियोग पक्ष भा. दं. वि. च्या कलम ३६६ मध्ये नमूद केलेल्या उद्देशांसाठी अपहरण केले आहे हे सिद्ध करत नाही, तोपर्यंत न्यायालय आरोपीला भा. दं. वि. च्या कलम ३६६ करीता दोषी ठरवू शकत नाही आणि त्या अंतर्गत शिक्षा देऊ शकत नाही. [परिच्छेद १०-१२] [१०००ई-एच; १००१-अ-ब].

१.२ भा. दं. वि. च्या विविध कलमांखाली एफ. आय. आर. नोंदवल्यानंतर एका आठवड्यानंतर, अपीलकर्ता महिलेने तिच्या आईला घटनेचे वर्णन केल्यानंतर पुढील निवेदन दिले ज्यामध्ये अपीलकर्ता महिलेने विनयभंगाचा गुन्हा नोंदविला. लाजेखातर तीने ही बाब यापूर्वी निदर्शनास आणली नाही ह्या तिच्या

स्पष्टीकरणावर विश्वास ठेवता येत नाही कारण एफ. आय. आर. घटनेच्या पाच दिवसांनंतर दाखल करण्यात आला होता आणि म्हणूनच तिने योग्य विचारविनिमय करून तोच अर्ज दाखल केला होता. पुन्हा, त्यानंतर एका आठवड्यात तिने विनयभंगाचा उल्लेख करण्याचा विचार का केला आणि आता तिला लाज का वाटली नाही? त्याचे कोणतेही स्पष्टीकरण नाही. उत्तरवादी क्रमांक २ च्या गाडीतून अपीलकर्त्याला बाहेर काढण्याचे कृत्य चौकीदाराने पाहिले. या प्रकरणाच्या या दृष्टिकोनातून, हे स्पष्ट आहे की आरोप हा उत्तरवादी क्रमांक २ ने जबरदस्तीने तिला त्याच्या घरी नेल्याच्या पैलूपुरता मर्यादित होता. तथापि, तिचे कपडे काढून टाकणे आणि तिला अनुचित प्रकारे स्पर्श करणे किंवा विनयभंग करणे याबाबतचे आरोप नंतर वाढविण्यात आले. अभिलेखावरून हे स्पष्ट आहे की उत्तरवादी क्रमांक २ आणि अपीलकर्ता महिला हे दोघे रिलेशनशिपमध्ये होते, जे त्यांच्या कुटुंबियांनाही माहित होते. प्राथमिक आरोप असे होते की उत्तरवादी क्रमांक २ ने तिला जबरदस्तीने त्याच्या घरी नेले. परंतु ते तिला अवैध संभोगास प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने नव्हते. प्रत्यक्षात, अभियोक्तीच्या म्हणण्यानुसार, उत्तरवादी क्रमांक २ ने प्रथम तिच्यावर प्रेम व्यक्त केले आणि नंतर त्याने तिला कंबरेच्या पट्ट्याने आणि हातांनी मारहाण करण्यास सुरुवात केली, जी वस्तुस्थिती अभिलेखावर स्पष्ट आहे. उत्तरवादी क्रमांक २ ने विनयभंग केल्याबाबतची तक्रार लगेचच देण्यात आली नव्हती तर ती नंतर देण्यात आली.

उत्तरवादी क्रमांक २ च्या त्याच कृतींवरून तिच्या इच्छेविरुद्ध लग्न करण्यासाठी किंवा तिला जबरदस्तीने किंवा फूस लावून बेकायदेशीर संभोगास प्रवृत्त करण्यासाठी तिचे अपहरण करण्याचा त्याचा हेतू दिसून येत नाही. जरी उत्तरवादी क्रमांक २ ने तिला जबरदस्तीने आपल्या घरी नेले हे सिद्ध झाले असले तरी, त्याचा तिच्याशी लग्न करण्याचा किंवा तिला जबरदस्तीने किंवा फूस लावून बेकायदेशीर संभोगास प्रवृत्त करण्याचा हेतू होता, हे नंतरचे विधान स्पष्टपणे पश्चातबुद्धीचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, असे म्हणता येईल की ते दोघेही रिलेशनशिपमध्ये होते आणि अचानक भावनांचा उद्रेक झाल्यामुळे किंवा उत्तरवादी क्रमांक २ च्या असुरक्षिततेच्या भावनेमुळे वरील कृत्य करण्यात आले. [परिच्छेद १३, १४][१००१-जी - एच ; १००२-ए, सी, इ-एफ]

क्रेफ फायनान्स लिमिटेड विरुद्ध श्री शांती होम्स (प्रा.) लिमिटेड आणि अन्य **(२००५) ७ एस. सी. सी. ४६७: [२००५] २ पुरवणी एस. सी. आर. ८७३**;

धरम पाल आणि इतर विरुद्ध हरियाणा राज्य आणि अन्य **(२०१४) ३ एस. सी. सी. ३०६ - लागू होणार नाही असा निर्णय दिला.**

<u>केस लॉ संदर्भ</u>

[२००५] २ पुरवणी एस. सी. आर. ८७३ .. लागू होणार नाही .. परिच्छेद ७,

(२०१४) ३ एस.सी.सी. ३०६ ..... लागू होणार नाही .. परिच्छेद ९

फौजदारी अपिलीय अधिकारिता : फौजदारी अपील क्रमांक ४५९/२०१६.

फौजदारी रिट याचिका क्रमांक ३७६६/२०१२ मध्ये मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये दिनांक ०६.०५.२०१३ च्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून दाखल झालेले अपील.

अपीलकर्त्याचे वकील : सिद्धार्थ लुथरा , वरिष्ठ वकील , रॉबिन जयसिंघानी, विकास मेहता, विजय गांधी, समीर चौधरी, सुश्री पूर्णिमा राज, सुश्री अनुश्री मेनन;

उत्तरवादींचे वकील : महेश जेठमलानी, वरिष्ठ वकील, निशांत आर. कटनेश्वरकर, आनंद, राहुल एम., सुश्री आर. एन. रेड्डी, डॉ. सुशील बलवाडा.

न्यायालयाचा निकाल न्यायमूर्ती आर. के. अग्रवाल यांनी दिला.

१. फौजदारी रिट याचिका क्रमांक ३७६६/२०१२ मध्ये मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये विद्वान एकल न्यायाधीशांनी च्या दिलेल्या ०६.०५.२०१३ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाविरुद्ध हे अपील दाखल करण्यात आले आहे. प्रस्तुत अपिलातील उत्तरवादी क्रमांक २ याने अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ४०वे न्यायालय, गिरगाव, मुंबई यांच्या न्यायालयात सी.सी. क्रमांक २१५/ पीडब्ल्यू/२००५ मध्ये भा. दं. वि. च्या कलम ३६३ अंतर्गत गुन्ह्यामधून दोषारोपमुक्त करावे यासाठी अर्ज केला होता. परंतु, सदर न्यायालयाने सदरचा अर्ज फेटाळून लावत दिनांक ०३.१०.२००६ रोजी कमिटल ऑर्डर पारित केली. त्यानंतर, प्रस्तुत अपिलातील

उत्तरवादी क्रमांक २ याने बृहन्मुंबई येथील सत्र न्यायालयामध्ये फौजदारी पुनरिक्षण अर्ज क्रमांक १२६१/२००७ दाखल करून सदर कमिटल ऑर्डरला आव्हानित केले. सदर न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी ४.०७.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशाला प्रस्तुत अपिलातील अपीलकर्ता कविता चंद्रकांत लखानी यांनी उच्च न्यायालयात फौजदारी रिट याचिका क्रमांक ३७६६/२०१२ दाखल करून सदर आदेशाला आव्हान दिले, परंतु उच्च न्यायालयाने सदर फौजदारी रिट याचिका फेटाळून लावली. अशा प्रकारे हे अपील दाखल झालेले आहे. येथे हे नमूद केले पाहिजे की सत्र न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनी दिनांक ०४.०७.२००७ च्या आदेशानुसार उत्तरवादी क्रमांक २ ला केवळ भा. दं. वि.च्या कलम ३६६ अंतर्गतच नव्हे तर भा. दं. वि.च्या कलम ३६३ आणि ५०६ (२) अंतर्गतही दोषमुक्त केले होते.

२. **प्रकरणाची तथ्ये थोडक्यात पुढीलप्रमाणे :**

(अ) प्रस्तुत अपिलातील अपीलकर्ता महिलेने दिनांक १२.०९.२००३ रोजी गावदेवी पोलिस स्टेशन, जिल्हा मुंबई येथे प्रस्तुत अपिलातील उत्तरवादी क्रमांक २ विरुद्ध प्रथम माहिती अहवाल (एफ.आय.आर.) क्रमांक २४७/२००३ नोंदवला होता. त्यावेळी तिने असे कथन केले की ०६.०९.२००३ च्या दुर्दैवी रात्री, उत्तरवादी क्रमांक २ आणि अपीलकर्ता महिला त्यांच्या मित्रांसह वाढदिवसाच्या पार्टीत उपस्थित होते. पार्टी संपल्यानंतर, उत्तरवादी क्रमांक २, अपीलकर्ता महिलेला , जी त्याच्याशी पूर्वी

रिलेशनशिपमध्ये होती, जेवणासाठी त्या ठिकाणी सोडण्याच्या बहाण्याने, मुंबईतील कफ परेड येथील त्याच्या घरी घेऊन गेला. तिथे पोहोचल्यानंतर, अपीलकर्ता महिलेने गाडीतून बाहेर येण्यास नकार दिल्यावर, उत्तरवादी क्रमांक २ ने तिला जबरदस्तीने उचलले, आपल्या घरी नेले आणि तिला बेडवर ठेवले. उत्तरवादी क्रमांक २ ने तिचे सर्व कपडे काढले आणि तिच्या कमरेच्या पट्ट्याने तिला मारहाण करण्यास सुरुवात केली आणि तिचा विनयभंग करण्यासाठी तिच्या गुप्तांगांना अनुचित प्रकारे स्पर्श करण्यास सुरुवात केली.

(ब) या प्रकरणामध्ये अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी , ४० वे न्यायालय, गिरगाव, मुंबई यांच्या न्यायालयात दिनांक ३०.०३.२००४ रोजी भा. दं. वि. च्या कलम ३६३, ३४२, ३२४, ३५४, ३२३ आणि ५०६ (भाग २) अंतर्गत आरोपपत्र दाखल करण्यात आले. उत्तरवादी क्रमांक २ ने भा. दं. वि. च्या कलम ३६३ अंतर्गत कोणताही गुन्हा दाखल होत नाही असे सांगून दोषारोपातून मुक्त करण्यात यावे असा अर्ज दाखल केला. दिनांक ०३.१०.२००६ रोजीच्या आदेशाद्वारे, विद्वान अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांनी सदर दोष मुक्तता अर्ज फेटाळला आणि सत्र न्यायालयाकडे खटला सोपवला जो सत्र खटला क्रमांक ८५८/२००६ म्हणून नोंदणी करण्यात आला.

(क) ३.१०.२००६ च्या आदेशामुळे व्यथित होऊन, उत्तरवादी क्रमांक २ ने सत्र

न्यायालयासमोर पुनरीक्षण अर्ज क्रमांक १२६१/२००६ दाखल केला. तसेच, उत्तरवादी क्रमांक २ ने भा. दं. वि. च्या कलम ३६६ अंतर्गत दोष मुक्तता मिळविण्यासाठी आणि प्रकरण पुन्हा कनिष्ठ न्यायालयात पाठवण्यासाठी सत्र खटला क्रमांक ८५८/२००६ मध्ये संकीर्ण अर्ज क्रमांक २४४/२००७ दाखल केला. बृहन्मुंबई येथील विद्वान सहाय्यक सत्र न्यायाधीश यांनी १०.०४.२००७ च्या आदेशाद्वारे, उत्तरवादीक्रमांक २ ने दाखल केलेला संकीर्ण अर्ज क्रमांक २४४/२००७ ला फेटाळून लावला.

(ड) दिनांक ०३.१०.२००६ आणि १० .०४.२००७ च्या आदेशाने व्यथित होऊन, उत्तरवादी क्रमांक २ ने उच्च न्यायालयात फौजदारी अर्ज क्रमांक १३४०/२००७ दाखल केला. दिनांक २५.०४.२००७ रोजी, उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांसमोर सदर अर्ज सुनावणीसाठी आला तेव्हा, उत्तरवादी क्रमांक २ ने सत्र न्यायालयासमोर पुनरीक्षण अर्ज निकाली निघेपर्यंत खटल्याची सुनावणी पुढे चालवू नये असे आदेश देण्याची विनंती करून तो मागे घेतला. उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांनी २५.०४.२००७ च्या आदेशाद्वारे, सदर पुनरीक्षण अर्ज निकाली निघेपर्यंत सुनावणीची कार्यवाही स्थगित केली.

(इ) दिनांक ४.०७.२००७ च्या आदेशाद्वारे, विद्वान अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी उत्तरवादी क्रमांक २ ने दाखल केलेला पुनरीक्षण अर्जाला मंजूर करताना दिनांक ०३.१०.२००६ चा आदेश रद्द केला. विद्वान न्यायाधीशांनी उत्तरवादी क्रमांक २

ला केवळ भा. दं. वि.च्या कलम ३६६ अंतर्गतच नव्हे तर भा. दं. वि.च्या कलम ३६३ आणि ५०६(२) अंतर्गतही दोषमुक्त केले. दिनांक १३.०६.२०१२ रोजी, उत्तरवादी क्रमांक २ विरुद्ध भा. दं. वि. च्या कलम ३४२, ३२४, ३२३ आणि ३५४ अंतर्गत आरोप निश्चित करण्यात आले. दिनांक ४.०७.२००७ च्या आदेशाने व्यथित होऊन, अपीलकर्त्याने उच्च न्यायालयात फौजदारी रिट याचिका क्रमांक ३७६६/२०१२ दाखल केली. उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी , दिनांक ०६.०५.२०१३ च्या आदेशानुसार, अपीलकर्त्याने दाखल केलेली रिट याचिका फेटाळून लावली.

(फ) दिनांक ०६.०५.२०१३ च्या न्यायनिर्णयाने व्यथित होऊन, अपीलकर्त्याने या न्यायालयासमोर हे अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता महिलेचे विद्वान वरिष्ठ वकील श्री. सिद्धार्थ लुथरा, उत्तरवादी क्रमांक २ चे विद्वान वरिष्ठ वकील श्री महेश जेठमलानी आणि उत्तरवादी-राज्याचे विद्वान वकील श्री निशांत आर. कटनेश्वरकर यांचे युक्तिवाद ऐकले.

<u>विचारार्थ घेण्यात आलेले मुद्दे</u>:

४. या न्यायालयासमोर विचारात घेण्याचा एकमेव मुद्दा हा आहे की प्रकरणातील सध्याची तथ्ये आणि परिस्थिती विचारात घेता, अपीलकर्ता महिलेने भा. दं. वि. च्या कलम ३६६ चा समावेश निश्चित केलेल्या आरोपांमध्ये होईल असा खटला सादर केला आहे का?

५. आम्ही दोन्ही बाजूंनी दिलेले युक्तिवाद ऐकले आहेत आणि अभिलेखाचे अवलोकन केले आहे.

<u>परस्परविरोधी युक्तिवादः</u>

६. अपीलकर्ता महिलेच्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी असा युक्तिवाद केला की ही घटना ०६/०७.०९.२००३ रोजी घडली आणि १२ .०९.२००३ रोजी अपीलकर्ता महिलेने केलेल्या तक्रारीवर प्रथम खबरी अहवाल नोंदवण्यात आला. पुढे, अपीलकर्ता महिलेने १६.०२.२००४ रोजी एक पुरवणी जबाब नोंदविला आणि जर तक्रार आणि पुरवणी जबाब त्यांच्या खऱ्या दृष्टिकोनातून विचारात घेतले तर, भा. दं. वि. च्या कलम ३६६, ३६३ आणि ५०६(२) अंतर्गत कथित गुन्ह्यांबद्दल उत्तरवादी क्रमांक २ ला दोषमुक्त केले जाईल असा कोणताही खटला सादर करण्यात आलेला नाही.

७. त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ, अपीलकर्ता महिलेच्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी **क्रेफ फायनान्स लिमिटेड विरुद्ध श्री शांती होम्स (पी) लिमिटेड आणि अन्य** (२००५) ७ एस. सी. सी. ४६७ ह्या प्रकरणामध्ये दिलेल्या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. त्यांनी, म्हणून, असा युक्तिवाद केला की वादग्रस्त आदेश तसेच उत्तरवादी क्रमांक २ ला निर्दोष सोडण्याचा सत्र न्यायालयाचा आदेश या न्यायालयाने रद्द करावा.

८. उत्तरवादी क्रमांक २ च्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी, तथापि, असा

युक्तिवाद सादर केला की ज्या भा. दं. वि. च्या कलम ३६६, ३६३ आणि ५०६(२) अंतर्गत गुन्हे केल्याबद्दल दिनांक १२.०९.२००३ रोजीचा प्रथम खबरी अहवाल ज्या तक्रारीच्या आधारे दाखल करण्यात आला होता त्यामध्ये त्याबाबत जरासाही उल्लेख नाही आणि सुमारे ५ (पाच) महिन्यांनंतर अपीलकर्ता महिलेने दिलेला पुरवणी जबाब हा उत्तरवादी क्रमांक २ ला इतर कलमांखाली देखील गुंतवण्यासाठी केवळ एक पश्चातबुद्धी जबाब आहे आणि म्हणूनच, त्यावर भरवसा ठेवता येत नाही.

९. उत्तरवादी क्रमांक २ च्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी **धरम पाल आणि इतर विरुद्ध हरियाणा राज्य आणि इतर** (२०१४) ३ एससीसी ३०६ या खटल्यातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा संदर्भ दिला आणि असा युक्तिवाद सादर केला की उच्च न्यायालय आणि सत्र न्यायालयाने दिलेल्या आदेशात कोणत्याही हस्तक्षेपाची आवश्यकता नाही.

<u>चर्चा</u>:

१०. वरील पार्श्वभूमीवर, भा. दं. वि. च्या कलम ३६६ मधील घटकांचा उल्लेख करणे येथे उचित ठरेल जे खालीलप्रमाणे आहेत:-

> **“३६६. “विवाह इत्यादीची सक्ती करण्याकरिता स्त्रीचे बालापहरण किंवा अपहरण करणे किंवा तिला प्रलोभित करणे :-** कोणत्याही स्त्रीला तिच्या इच्छेविरुद्ध कोणत्याही व्यक्तीशी विवाह करण्याची

सक्ती करता यावी या उद्देशाने किंवा तिच्यावर तशी सक्ती होईल असा संभव असल्याची स्वतःला जाणीव असताना, अथवा विधिनिषिद्ध संभोगाकरिता तिच्यावर बळजबरी करता यावी किंवा तिला तशी फूस लावता यावी या उद्देशाने अगर विधिनिषिद्ध संभोगाकरिता तिच्यावर बळजबरी होईल किंवा तिला तशी फूस लावण्यात येईल असा संभव असल्याची स्वतःची जाणीव असताना जो कोणी तिचे बालापहरण किंवा अपहरण करील त्याला, दहा वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची शिक्षा होईल, व तो द्रव्यदंडासही पात्र होईल; आणि या संहितेमध्ये व्याख्या करण्यात दिल्यानुसार फौजदारी धाकदपटशाच्या मार्गाने किंवा सत्तेचा दुरुपयोग करून किंवा सक्तीच्या अन्य कोणत्याही उपायाने जो कोणी एखाद्या स्त्रीला दुसऱ्या व्यक्तीशी विधिनिषिद्ध संभोग करण्याची तिच्यावर बळजबरी करता यावी किंवा तिला फूस लावता यावी या उद्देशाने अथवा त्याकरिता तिच्यावर बळजबरी होईल किंवा तिला त्यासाठी फूस लावण्यात येईल याची जाणीव असताना एखाद्या ठिकाणाहून दार जाण्यास प्रवृत्त करील तोदेखील पूर्वोक्ताप्रमाणे शिक्षेस पात्र असेल."

'अपहरण' हा गुन्हा करण्यासाठी एखाद्या व्यक्तीला बेकायदेशीरपणे

जबरदस्तीने किंवा फसवणुकीने, म्हणजेच जबरदस्तीने किंवा कपटपूर्ण मार्गांनी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास भाग पाडणे आवश्यक आहे. या कलमाअंतर्गत आरोपीचा हेतू हा गुन्ह्याचा आधार आणि आवश्यक घटक आहे. आरोपीची इच्छाशक्ती, हेतू आणि वर्तन गुन्हा निश्चित करते; ते फक्त आरोपीने महिलेचे बालापहरण किंवा अपहरण कोणत्या हेतूने केले यावर अवलंबून असतात आणि प्रत्येक प्रकरणात आरोपीचा हेतू, हा गुन्हा निश्चित करण्यासाठी महत्त्वाचा प्रश्न असतो. एकदा आरोपीचा आवश्यक हेतू स्थापित झाला की, गुन्हा पूर्ण होतो, मग आरोपी त्याचा उद्देश साध्य करण्यात यशस्वी झाला असो अथवा नसो आणि महिलेने लग्नाला किंवा बेकायदेशीर संभोगाला संमती दिली असो अथवा नसो.

११. याशिवाय, भा. दं. वि. च्या कलम ३६६ अंतर्गत गुन्हा ठरवण्यासाठी, फिर्यादी पक्षाने हे सिद्ध करणे आवश्यक आहे की आरोपीने तक्रारदार महिलेला कोणत्याही ठिकाणाहून जाण्यास फूस लावली किंवा जबरदस्तीने भाग पाडले, असे प्रलोभन कपटपूर्ण मार्गाने होते, असे अपहरण तक्रारदाराला बेकायदेशीर संभोगासाठी प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने झाले होते आणि/किंवा आरोपीला हे माहित होते की तक्रारदाराला तिच्या अपहरणामुळे विधिनिषिद्ध संभोगासाठी प्रवृत्त केले जाऊ शकते. केवळ अपहरण आरोपीला या दंडविधान कलमाच्या कक्षेत आणत नाही. भा. दं. वि. च्या कलम ३६६ आय.पी.सी. अंतर्गत आरोपाबाबत, केवळ महिलेचे अपहरण झाल्याचे

आढळणे पुरेसे नाही, हे सिद्ध करणे आवश्यक आहे की आरोपीने महिलेचे अपहरण या हेतूने केले होते की तिला जबरदस्तीने केले जाऊ शकते, किंवा त्याला याची जाणीव आहे की तिला कोणत्याही व्यक्तीशी लग्न करण्यास भाग पाडले जाईल किंवा तिला विधिनिषिद्ध संभोगासाठी जबरदस्ती केली किंवा फूस लावली जाईल किंवा त्याला याची जाणीव आहे की तिला विधिनिषिद्ध संभोगासाठी जबरदस्ती केली किंवा फूस लावली जाईल. जोपर्यंत अभियोक्ता पक्ष हे सिद्ध करत नाही की अपहरण भा. दं. वि. च्या कलम ३६६ नमूद केलेल्या उद्देशांसाठी आहे, तोपर्यंत न्यायालय आरोपीला दोषी ठरवू शकत नाही आणि भा. दं. वि. च्या कलम ३६६ अंतर्गत शिक्षा देऊ शकत नाही.

१२. आमचे असे विचारपूर्वक मत आहे की खालील न्यायालयांसमोर दाखल केलेल्या सर्व अर्जांचा आणि आदेशांचा सारांश सारखाच आहे . खालील सर्व न्यायालयांमध्ये, उत्तरवादी क्रमांक २ ने दाखल केलेले इतर अर्ज या टप्प्यावर न्यायालयाच्या निदर्शनास आणण्यात आले नाहीत हे विचारात घेण्याचा काही अर्थ नाही. या प्रकरणाच्या दृष्टीने, आपण आपली चर्चा खटल्याच्या सध्याच्या तथ्ये आणि परिस्थितीत भा. दं. वि. च्या कलम ३६६ चे लागू होण्यापुरती मर्यादित ठेवणे योग्य ठरेल.

१३. या प्रकरणातील अपीलकर्ता महिला आणि उत्तरवादी क्रमांक २ हे एकमेकांशी रिलेशनशिपमध्ये होते. दिनांक ०६.०९.२००३ रोजी, अपीलकर्ता आणि उत्तरवादी क्रमांक २ त्यांच्या एका मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीला उपस्थित होते.

तक्रारीतील आरोपांनुसार, दिनांक ०७.०९.२००३ च्या पहाटे, जेव्हा सर्व मित्र जेवणासाठी कार्यक्रमस्थळी गेले, तेव्हा उत्तरवादी क्रमांक २, तिला कार्यक्रमस्थळी सोडण्याच्या उद्देशाने, मुंबईतील कफ परेड येथील त्याच्या घरी घेऊन गेला आणि तिला गाडीतून खाली उतरण्यास सांगितले. जेव्हा तिने नकार दिला, तेव्हा उत्तरवादी क्रमांक २ ने तिला जबरदस्तीने गाडीतून बाहेर काढले, उचलून आपल्या घरी नेले आणि त्याच्या बेडवर ठेवले. यानंतर, उत्तरवादी क्रमांक २ ने "मी तुझ्यावर प्रेम करतो आणि तू माझ्याशी लग्न का करत नाहीस" असे म्हणण्यास सुरुवात केली आणि हात आणि पट्ट्याने तिला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याने तिचे डोके भिंतीवरही आपटले. परिणामी, तिच्या शरीरावर जखमा झाल्या. पहाटे २ वाजता, उत्तरवादी क्रमांक २ चे वडील घरी परतले तेव्हा ते अपीलकर्ता महिलेला तिच्या घरी घेऊन गेले. दिनांक १२.०९.२००३ रोजी, भा. दं. वि. च्या विविध कलमांखाली प्रथम खबरी अहवाल नोंदवण्यात आला. त्यानंतर एका आठवड्याने, म्हणजे दिनांक १९.०९.२००३ रोजी, अपीलकर्ता महिलेने तिच्या आईला गुन्ह्यात घडलेली घटना कथन केली. त्यातून तिने विनयभंगाचा गुन्हा निष्पन्न केल्यामुळे आणखी एक जबाब नोंदविला. लाजेखातर तिने सदरची घटना आधी सांगितली नव्हते हे तिचे स्पष्टीकरण विश्वास निर्माण करत नाही कारण प्रथम खबरी अहवाल हा घटनेच्या पाच दिवसांनंतर दाखल करण्यात आला होता आणि म्हणूनच, तिने तो योग्य विचारविनिमय करून दाखल केला होता. त्यानंतर, पुन्हा

एकदा, एका आठवड्यात तिने विनयभंगाचा उल्लेख करण्याचा विचार केला आणि त्यावेळेस तिला लाज का वाटली नाही? त्याचे कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. उत्तरवादी क्रमांक २ च्या गाडीतून अपीलकर्त्याला बाहेर काढण्याचे कृत्य चौकीदाराने पाहिले होते. या प्रकरणाच्या या दृष्टिकोनातून, हे स्पष्ट आहे की हा आरोप उत्तरवादी क्रमांक २ ने तिला जबरदस्तीने त्याच्या घरी नेल्याच्या पैलूपुरता मर्यादित आहे. तथापि, तिचे कपडे काढून टाकणे आणि तिला अनुचित प्रकारे स्पर्श करणे किंवा विनयभंग करणे हे आरोप नंतर जोडले गेले. या न्यायालयाने वारंवार असे म्हटले आहे की केवळ अपहरण केल्याने आरोपी भा. दं. वि. च्या कलम ३६६ च्या कक्षेत येत नाही. हे सिद्ध करणे आवश्यक आहे की आरोपीने महिलेचे अपहरण या उद्देशाने केले होते की तिच्यवर जबरदस्ती केली जाऊ शकते, किंवा त्याला याची स्वतःची जाणीव होती की तिला कोणत्याही व्यक्तीशी लग्न करण्यास भाग पाडले जाईल किंवा तिला जबरदस्तीने किंवा फूस लावून विधिनिषिद्ध संभोग करण्यास भाग पाडले जाऊ शकते किंवा ज्याला याची स्वतःची जाणीव होती की तिला विधिनिषिद्ध संभोग करण्यास भाग पाडले जाईल किंवा तिला जबरदस्तीने किंवा फूस लावून विधिनिषिद्ध संभोग करण्यास भाग पाडले जाईल. अभिलेखावर हे स्पष्टपणे नमूद आहे की उत्तरवादी क्रमांक २ आणि येथील अपीलकर्ता महिला हे रिलेशनशिपमध्ये होते जे त्यांच्या कुटुंबियांना देखील माहित होते. प्राथमिक आरोप असे आहेत की उत्तरवादी क्रमांक २ तिला जबरदस्तीने त्याच्या घरी घेऊन गेला.

परंतु ते तसे करणे तिला विधिनिषिद्ध संभोगासाठी फूस लावण्याच्या हेतूने नव्हते. प्रत्यक्षात, अभियोक्तीच्या म्हणण्यानुसार, उत्तरवादीक्रमांक २ ने प्रथम तिच्यावर प्रेम व्यक्त केले आणि नंतर त्याने तिला त्याच्या कंबरेच्या पट्ट्याने आणि हातांनी मारहाण करण्यास सुरुवात केली, जी वस्तुस्थिती रेकॉर्डवर स्पष्ट आहे. उत्तरवादी क्रमांक २ च्या हातून विनयभंग झाल्याचे निवेदन लगेचच दिले गेले नाही तर नंतर दिले गेले. उत्तरवादी क्रमांक २ च्या त्याच कृतींवरून तिच्या इच्छेविरुद्ध लग्न करण्यासाठी किंवा तिला जबरदस्तीने किंवा फूस लावून विधिनिषिद्ध संभोगास प्रवृत्त करण्यासाठी तिचे अपहरण करण्याचा त्याचा हेतू दिसून येत नाही.

१४. उत्तरवादी क्रमांक २ ने तिला जबरदस्तीने आपल्या घरी नेले हे सिद्ध झाले असले तरी, त्याचा तिच्याशी लग्न करण्याचा किंवा तिला जबरदस्तीने किंवा फूस लावून विधिनिषिद्ध संभोगास प्रवृत्त करण्याचा हेतू होता हा नंतर दिलेला जबाब पश्चातबुद्धीचा जबाब आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, असे म्हणता येईल की ते दोघेही रिलेशनशिपमध्ये होते आणि अचानक भावनांचा उद्रेक झाल्यामुळे किंवा उत्तरवादी क्रमांक २ बाबत असुरक्षिततेच्या भावनेमुळे वरील कृत्य करण्यात आले. शिवाय, पक्षकारांच्या च्या विद्वान वरिष्ठ वकिलांनी ज्या न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे त्यांचा या प्रकरणातील तथ्यांशी काहीही संबंध नाही.

१५. वरील चर्चेनुसार, आमचे असे मत आहे की भा. दं. वि. च्या कलम ३६६

अंतर्गत आरोप निश्चित करता येण्यासारखे नाहीत आणि तशी भूमिका घेण्याचा उच्च न्यायालयाचा निर्णय योग्यच आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाशी आम्ही सहमत आहोत. तथापि, हे प्रकरण २००३ पासून प्रलंबित असल्याने आणि अजूनही आरोप निश्चितीच्या टप्प्यावर असल्याने, या निकालाच्या तारखेपासून ६ (महिन्यांमध्ये) खटला पूर्ण करण्याचे निर्देश आम्ही न्यायचौकशी न्यायालयाला देणे योग्य मानतो. हे देखील स्पष्ट करतो की या निकालात नोंदवलेले निरीक्षण केवळ भा. दं. वि. च्या कलम ३६६ च्या लागू होतात किंवा नाही एवढ्या पुरताच मर्यादित आहेत. न्यायचौकशी न्यायालय गुणवत्तेनुसार प्रकरणाचा निर्णय घेईल . अपील फेटाळण्यात येत आहे.

दिव्या पांडे. अपील फेटाळले. ----------

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजावून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल.

- x - x - x - x - x - x - x - x - x -